# जनसंपर्क अधिकारी
## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १६८-२३** **दिनांक :- २५/०५/२०२३**

## जबरी चोरी करणा-या आरोपीतांना अटक करुन ४ गुन्हयांची उकल.
## पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १७/०५/२०२३ रोजी ०९.३० वा.चे सुमारास फिर्यादी श्री. दत्तायत्र जगन्नाथ बेलोसे, वय ४३ वर्षे, रा. नाना-नानी पार्क, मनवेलपाडा, विरार(पु.) हे त्यांचे मोटर सायकलवरुन मुंबईकडून गुजरातच्या दिशेने जात असताना सायली पेट्रोल पंपाचे जवळ, वसई फाटा, वसई (पु.) येथे दोन अनोळखी इसमांनी एन.एस.पल्सर मोटर सायकलवर येवुन, फिर्यादी यांचे खिशात असलेला विवो कंपनीचा मोबाईल फोन जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेलेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १७/०५/२०२३ रोजी पेल्हार पोलीस ठाणेत अज्ञात आरोपीतांविरुध्द गु.रजि.नं. I ४८२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयातील आरोपी व गुन्हयात वापरण्यात आलेल्या मोटार सायकलचा गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या घटनास्थळास व आजूबाजूच्या परिसरास भेट देवुन तांत्रिक माहितीच्या आधारे क्रमांक एम.एच.०४ एल.एल.०३०१ असा निष्पन्न करुन आरोपीत नामे १) **मोहम्मद सलीम अन्सारी, वय २१ वर्षे**, २) **मोहम्मद वारीस अली खान, वय २० वर्षे** दोन्ही रा. अंजुर फाटा, भिवंडी, जि.ठाणे यांना दिनांक १८/०५/२०२३ रोजी नमुद गुन्हयात २४ तासाचे आत अटक केली व त्यांचेकडून गुन्हयात वापरण्यात आलेली मोटार सायकल व मोबईल हस्तगत करण्यात आला आहे. नमूद आरोपी हे सध्या पोलीस कोठडीत असून गुन्हयाचा पुढील तपास पोउनि सनिल पाटील हे करीत आहे. आरोपीतांकडून उघडकीस करण्यात आलेले गुन्हे पुढीलप्रमाणे :-

### :- उघडकीस आलेले गुन्हे :-

| अक्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| ०१. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ४८२/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ०२. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ४८३/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ०३. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ४८५/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे |
| ०४. | पेल्हार पोलीस ठाणे | गु.रजि.नं. I ४८६/२०२३, भा.दं.वि.सं. कलम ३९२, ३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंत लब्दे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि सनिल पाटील, पोहवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, निखिल मंडलिक यांनी केलेली आहे.

----oooo----